# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १८/०६/२००८ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०७) इतिवृत्त**

**बुधवार, दिनांक १८ जुन २००८ रोजी** स्थायी समितीची सभा (दि. १७/६/२००८ रोजी तहकुब केलेली सभा) मा.सभापती **श्री. अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील **मलीक अंबर स्थायी समिती सभागृह** येथे दुपारी ४-५० वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली. या सभेला मा.आयुक्त(म.), नगर सचिव यांचे सह संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१. श्री. अ. रशीद खान
२. श्री. कचरू विश्वनाथ मोरे
३. श्री. मोहन धन्नुलाल मेघावाले
४. श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर
५. श्री. कचरू सोनवणे
६. श्री. जोशी संजय रामदास
७. श्री. सतीश विश्वनाथ कटकटे
८. श्री. रविकांत काशिनाथ गवळी
९. श्रीमती मोमीन सफिया फिरदोस
१०. श्रीमती जयश्री किवळेकर
११. श्री. सिताराम सुरे
१२. श्री. नारायण तिलोकचंद कुचे
१३. श्री. जावेद हसन खान

**विषय क्र. ४२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महुनगर येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणे बाबतच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २००६-०७ च्या दरसूची नुसार रक्कम रूपये १५,००,०००/- चे अंदाजपत्रक असून सदरील काम दलित वस्ती सुधार योजना मधुन प्रस्तावित आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता, एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा उघडण्यात आल्या असता, त्यात खालील प्रमाणे दर भरून प्राप्त झाले.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. संधु कन्स्ट्रक्शन | ०७.८९% कमी दराने |
| २. | मे. आर.के. कन्स्ट्रक्शन | ०४.७७% कमी दराने |
| ३. | मे.युनिव्हर्सल इंजिनिअर्स & कॉन्ट्रॅक्टर | ३५.००% जास्त दराने |

वरील प्रमाणे प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०७.८९% कमी दराची मे. संधु कन्स्ट्रक्शन यांची निविदा प्राप्त आहे.

तरी सदरील कामासाठी मे.संधु कन्स्ट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०७.८९% कमी दराच्या निविदेचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.अ.रशिद खान :कमी दराची निविदा आली असून दोन वर्षापूर्वीचे काम आहे. काम चांगल्या प्रतीचे होणार आहेत का?

मा.सभापती : नवीन डीएसआर प्रमाणे अंदाजपत्रक तयार करून हा प्रस्ताव पुन्हा मान्यत्येसाठी सादर करावा. सदर प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात येतो.

**ठराव :**

सभागृहातील चर्चेनुसार सदरील विषय तुर्त स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ४३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२६ मधील एन-८ भागातील ओंकार गॅस एजन्सी ते वेणुताई चव्हाण शाळेजवळील नाल्याचे पुन:र्बांधकाम करण्याच्या कामाचे रक्कम रू.११,०४,०००/- अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती सभा दि.२८.२.२००८ विषय क्र.३७४ अन्वये मान्यता मिळालेली असुन, त्यानुसार कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता फक्त एक निविदा प्राप्त झाली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

१. रत्नगुरू कन्स्ट्रक्शन ६.७८% कमी दराने

त्यानुसार रत्नगुरू कन्स्ट्रक्शन यांची ६.७८% कमी दराची निविदा मान्य करणेस्तव मा.आयुक्त यांनी शिफारस केली आहे. करीता प्रस्ताव स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.२६ मधील एन-८ भागातील ओंकार गॅस एजन्सी ते वेणुताई चव्हाण शाळेजवळील नाल्याचे पुन:र्बांधकाम करणेकरीता प्राप्त झालेल्या निविदेनुसार सदरील काम रत्नगुरू कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६.७८% कमी दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, हॉटेल अशोकाजवळील मनपा हद्दीतील मोकळ्या जागेत सार्वजनिक व्यायामशाळा बांधणे करीता सा.बां.विभागाचे जिल्हा दरसुची सन २००५-०६ नुसार रक्कम रूपये ९,८३,२२६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. सदरील कामाचा खर्च मा.आमदार श्री. श्रीकांत जोशी यांच्या स्थानिक विकास कार्यक्रमा अंतर्गत करण्यात येणार आहे.

त्यानुसार उपरोक्त कामास्तव निविदा मागविण्यात आल्या असता एकुण ५ निविदा दर भरून प्राप्त झाल्या होत्या. पैकी के.एस.कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.६०% जास्त दराच्या निविदेस मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार काम प्रगतीपथावर आहे.

सदरील कामास्तव अतिरिक्त कामांसाठी रक्कम रू.६,३१,०००/- चे वाढीव अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी स्थायी समिती सभेसमोर सादर करणेबाबत शिफारस केलेली आहे. रक्कम रू.६.३१ लक्ष खर्च मनपा फंडातून सन २००८-०९ या आर्थिक वर्षाच्या तरतुदी अंतर्गत करण्यात येणार आहे. सदरील वाढीव तरतुदी अंतर्गत स्थापत्य कामासाठी रक्कम रू.३,७५,६०८/- + वास्तु विशारद फीस रक्कम रू.५,६५०/- + विद्युत कामासाठी रू.२,५०,०००/- ची तरतुद करण्यात आली आहे.

त्यानुसार सदरील कामाचे एकुण अंदाजपत्रक रक्कम रू.९,८३,२२६/- + ६,३१,०००/- = रू. १६,१४,२२६ /- चा प्रस्ताव व वाढीव काम, अतिरिक्त बाबी यामुळे मुळ गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्याचा प्रसताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हॉटेल अशोकाजवळील मनपा हद्दीतील मोकळ्या जागेत सार्वजनिक व्यायामशाळा बांधणेच्या कामात अतिरिक्त बाबींमुळे, रक्कम रू.९,८३,२२६/- + ६,३१,०००/-(वाढीव रक्कम) = रू. १६,१४,२२६ /- च्या सुधारीत अंदाजपत्रकास तसेच वाढीव काम, मुळ गुत्तेदार के.एस.कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एन-१२ सिडको प्रभाग क्र.१५ येथे बहुउद्देशीय हॉल व सभागृह बांधणे करीता सा.बां.विभागाच्या सन २००६-०७ च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रूपये १९,९९,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा.स्थायी समितीने ठराव क्र.१४१ दि.१८.९.२००७ च्या सभेमध्ये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामास्तव फेरनिविदा मागविण्यात आल्या असता एकुण २ निविदा विक्री झाल्या व १ निविदा दर भरून प्राप्त झाली. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

१. काझी म. फारूख म. इस्माईल ४.९९% जास्त दराने

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त दराची निविदा काझी म.फारूख म. इस्माईल यांची प्राप्त झालेली आहे. त्यास मा.आयुक्त यांनी स्थायी समिती समोर सादर करणेबाबत शिफारस केलेली आहे.

त्यानुसार काझी म.फारूख म. इस्माईल यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-१२ सिडको प्रभाग क्र.१५ येथे बहुउद्देशीय हॉल व सभागृह बांधणे करीता प्राप्त झालेल्या निविदेनुसार सदरील काम काझी म.फारूख म.इस्माईल यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ४६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की, श्री.वि.वा.जावरे, प्रकल्प संचालक यांना हृदयरोग उपचारासाठी एकुण खर्च रूपये ४,४६,,९६९/- झाला आहे. सदर खर्चाच्या ५% रक्कम संबंधीतांनी रक्कम रू.२२,३४८/- शासन निर्णय क्र.एएमजी/२००५/९/प्र.क्र.१/आरोग्य-३, दि.१९/३/२००५ व स्थायी समितीमध्ये दि.५/२/२००८ रोजी पारित झालेल्या ठराव क्र.३६५ नुसार मनपा फंडात जमा करणे आवश्यक आहे.

त्यांनी उपचारासाठी खर्च केलेल्या एकुण रक्कम रू.४,४६,९६९/- पैकी अनुज्ञेय खर्च रूपये ४,४३,२४३/- इतका आहे. त्याच्या ९०% खर्च रूपये ३,९८,९२४/- नियमानुसार देय आहे. संबंधीतांना कार्यालयातर्फे रूपये ३,७९,९६१/- अग्रीम देण्यात आला आहे.

तरी संबंधीतास अनुज्ञेय खर्च रूपये ३,९८,९२४/- च्या वैद्यकीय देयक मान्य करण्याचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.वि.वा.जावरे, प्रकल्प संचालक यांना हृदयरोग उपचारासाठी खर्च केलेल्या एकुण रक्कम रू.४,४६,९६९/- पैकी अनुज्ञेय खर्च रूपये ४,४३,२४३/- च्या ९०% खर्च रूपये ३,९८,९२४/- नियमानुसार देय होत असल्याने (अग्रीम र.रू.३,७९,९६१/- च्या समायोजनासह) संबंधीतास अनुज्ञेय खर्च रूपये ३,९८,९२४/- चे वैद्यकीय देयक मान्य करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी प्रस्ताव सादर करीत आहेत की, श्री.मोहम्मद इकबाल गुलाम जिलानी, शिपाई, वॉर्ड-क, मनपा औरंगाबाद यांनी त्यांच्या वडिलांच्या डोळ्याच्या रेटीनाचा आजारावर (ARMD-(Age related macular degeneration) with Subretinal neovascular membrane) डॉ.सासवडे, सासवडे नेत्र रूग्णालय व लेस सेंटर, डायबेटीक नेत्र चिकित्सा केंद्र येथे उपचार घेतला असून कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-२/३२२/०६, दि.२०.४.२००६ अन्वये श्री.मोहम्मद इकबाल गुलाब जिलानी यांच्या वडिलांच्या आजारावर औषधोपचारासाठी खर्च केलेली वैद्यकीय रक्कम रू.१,२४,८९९/- च्या

८०% देय रक्कम रू.९९,८५५/- (नव्याण्णव हजार आठशे पंचावन्न मात्र) संबंधीतास यापुर्वी अदा करण्यात आलेली आहे.

दुसऱ्यांदा पुन्हा या आजारासाठी औषधोपचारावर रू.१,३०,५९३/- इतकी रक्कम खर्च केलेली आहे. सदरील रक्कमेच्या ८०% देय रक्कम रू.१,०४,४७४/-(एक लाख चार हजार चारशे चौऱ्याहत्तर) संबंधीतास अदा करणे आहे. करीता दि.२०.४.२००६ ते १२.५.२००७ या कालावधीत एकूण खर्च केलेली रक्कम रू.१,२४,८९९+१,३०,९०३ = २,५५,७२२/- एवढ्या वैद्यकीयखर्चास मंजुरी देऊन संबंधीतास सध्याचे देयक रू.१,३०,९०३/- च्या ८०% देय रक्कम रू.१,०४,४७४/- अदा करण्यास्तव प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.अ.रशिद खान : यात ८० टक्के परतावा दिला अगोदरच्या ठरावात ९० टक्के आहे. यातही ९० टक्के करण्यात यावे दुरूस्तीसह मंजूरी द्यावी.

मा.सभापती : आताच स.सदस्यांनी केलेल्या दुरूस्तीसह या प्रस्तावात मान्यता देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.मोहम्मद इकबाल गुलाब जिलानी यांच्या वडिलांच्या आजारावर औषधोपचारासाठी खर्च केलेली वैद्यकीय रक्कम दि.२०.४.२००६ ते १२.५.२००७ या कालावधीत एकूण खर्च केलेली रक्कम रू.१,२४,८९९+१,३०,९०३ = २,५५,७२२/- एवढ्या वैद्यकीय खर्चास मंजुरी देण्यात येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार संबंधीतास सध्याचे देयकाच्या ८०% देय रक्कम ऐवजी ९०% देय रक्कम अदा करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ४८ :</u>**

कार्यकारी अभियंता (वि.ड्रे.इ.व उ.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दि.३०.५.२००८ रोजी रात्री २ ते ३ वाजेच्या दरम्यान रेल्वे स्टेशन उड्डाण पुलावर पथदिव्याच्या पोलजवळ विद्युत शॉक लागून मो.आसेफ मो.रज्जाक या तरूणाचे अपघाती निधन झालेले आहे.

दि.३०.६.२००७ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेमध्ये विषय क्र.८७२ नुसार अशा प्रकारच्या अपघाताबाबत अर्थसहाय्य म्हणुन रू.२५,०००/- देण्याचा ठराव मंजुर करण्यात आलेला आहे.

करीता मयत मो.आसेफ मो.रज्जाक या तरूणाच्या कुटुंबास नुकसान भरपाई म्हणुन रू.२५,०००/- अर्थसहाय्य देण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.संजय जोशी :स्थायी समितीला अधिकार आहेत का? स्थायी समितीने सर्वसाधारण सभेकडे शिफारस करण्यास मान्यता द्यावी. उद्याच्या बैठकीसाठीच ठेवण्यात यावे.

मा. सभापती : रेल्वे स्टेशन उड्डाण पुलावर पथदिव्याच्या पोलजवळ विद्युत शॉक लागून मो.आसेफ मो.रज्जाक या तरूणाचे अपघाती निधन झाल्यामुळे संबंधीताचे कुटुंबियांस रू.२.०० लाख आर्थिक मदत देण्यास मंजुरी देण्यात येऊन सर्वसाधारण सभेकडे शिफारस करण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार दि.३०.५.२००८ रोजी रेल्वे स्टेशन उड्डाण पुलावर पथदिव्याच्या पोलजवळ विद्युत शॉक लागून मो.आसेफ मो.रज्जाक या तरूणाचे अपघाती निधन झाल्यामुळे मयत मो.आसेफ मो.रज्जाक या तरूणाच्या कुटुंबास नुकसान भरपाई म्हणुन रू.२,००,०००/- (रूपये दोन लक्ष)अर्थसहाय्य देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येऊन सर्वसाधारण सभेकडे शिफारस करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>चर्चा :-</u>**

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : महापालिकेच्या अस्थापनेवरील दैनिक वेतनावरील कर्मचारी यांना दैनिक वेतन कमी दिला जातो तो नियमाप्रमाणे जो असेल तो करण्यास मान्यता द्यावी.

मा.सभापती :अस्थापनेवरील दै. वेतनावरील कर्मचारी यांना नियमाप्रमाणे जो दैनिक वेतन असेल तो करण्यात मान्यता देण्यात येते अस्थापना विभागाने या संबधीत कार्यवाही करावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : श्री.के.एस.नवले नगरसचिव विभागात १० वर्षापासून दै.वेतनावर लघुटंकलेखक पदावर काम करतात. त्यांची प्रोसेस नुसार निवड झालेली आहे. त्यांनी मा.आयुक्त, मा.महापौर, मा.सभापती, स्थायी समिती यांना तसे निवेदन दिलेले आहे. श्री.नवले यांना वेतनश्रेणीवर सेवेत कायमस्वरूपी घेण्यास मान्यता द्यावी.

श्री.संजय जोशी : श्री.के.एस. नवले यांना सेवेत कायम करण्यास हरकत नाही.

श्री.रविकांत गवळी : नगरसचिव विभागात एकच दैनिक वेतनावर स्टेनो असल्याने इतिवृत्त वेळेवर तयार होत नाही श्री. के. एस. नवले हे गेल्या ११-१२ वर्षापासून दै.वेतनावर नगरसचिव विभागात करतात मा.सर्वोच्च न्यायालयाचे रोजंदारी कर्मचा-यांना सेवेत कायम करण्या बाबत जे निर्देश आहे त्यानुसार प्रशासनाने श्री.के.एस नवले या कर्मचा-यांच्या बाबतीत अंमलबजावणी का केली नाही. अंमलबजावणी होणार आहे का खुलासा घ्यावा.

उपआयुक्त(प्र.) : उपआयुक्त (म.) व सहाय्यक आयुक्त-१ हे सध्या मुंबईला गेलेले आहेत.

मा.सभापती : श्री.के.एस नवले लघुटंकलेखक यांचे निवेदन माझेकडे आलेले आहे ते गेल्या १०-१२ वर्षापासून दै.वेतनावर नगरसचिव विभागात काम करतात. नियमानुसार त्यांची या पदावर निवड झालेली असल्याने या पदावर त्यांना सेवेत कायम स्वरूपी घेण्याची स्थायी समितीच्या वतीने शिफारस करण्यात येते.अस्थापना विभागाने या बाबतीत तात्काळ कार्यवाही करावी.

श्रीमती जयश्री किवळेकर : या महापालिकेत नवीन मा.आयुक्त श्री.दिलीप बंड हे रूजू झाले त्यांनी अतिक्रमण हटविण्याची मोहिम हाती घेतली कौतुकास्पद आहे. शहराच्या विकास होण्यास अतिक्रमण आड येत आहे हे त्यांचे लक्षात आले. मा.आयुक्तांनी घेतलेला निर्णय हा धाडसी आहे. त्याद्दल मा.आयुक्त, उपआयुक्त श्री. शेटे व त्यांचे पथकातील सर्व कर्मचारी यांचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करावे. काढलेले अतिक्रमण पुन्हा होऊ देवू नये याची प्रशासनाने दखल घ्यावी. रस्त्यावर कुठेही अतिक्रमण असणार नाही याकडे ही लक्ष देण्याची गरज आहे. कौतुक टिकले पाहिजे. प्रशासनाला सर्व नागरीक सर्व लोकप्रतिनिधी व कर्मचारी सहकार्य करीत आहेत त्या सर्वाचे अभिनंदन करावे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : जे मत स.सदस्य यांनी मांडले त्यासी मी सहमत आहे. मा.आयुक्त यांनी अतिक्रमण काढण्याची मोहिम हाती घेतली हीच कार्यवाही पुढेही चालू ठेवावी. दोन दिवसात शहराचे वातावरण बदलले. रस्त्यावर हातगाडया घेवून उभे राहत असे ते बाजूला झ ाले. या मोहिमेला सर्वांनी सहकार्य करावे एवढीच विनंती. जर चुकीने कुणाचे काढले असेल तर त्यावर फेर विचार व्हावा. जो अभिनंदनास अनुमोदन आहे. या कामास शुभेच्छा देवून अशी मोहिम सतत रहावी. ही मोहिम सतत राबवावी अशी सर्वांच्या वतीने अपेक्षा करतो.

श्री.संजय जोशी : यासाठी प्रशासन अभिनंदनास पात्र आहे शंका नाही. परंतू अतिक्रमण काढल्यानंतर जागा रिकामी, स्वच्छ होते लगेच तेथे स्ट्रक्चर व्हायला पाहिजे.मेडीकल कॉलेजच्या रस्त्याच्या बाजूला अतिक्रमण काढले लगेच फुटपॉथ केला जेथे शक्य असेल तेथे अतिक्रमण काढल्यानंतर लगेच तारफेन्सींग तरी करावे, पुन्हा अतिक्रमण होणार नाही. ज्या ठिकाणचे काढले त्या ठिकाणी पुन्हा जावून अतिक्रमण झालेले नसल्याची खात्री करून घ्यावी.

श्री.अ.रशीद खान : नवीन मा.आयुक्त यांनी श्री.शेटे साहेब यांचेकडे मालमत्ता तसेच अतिक्रमण विभागाचा चार्ज दिला. यापूर्वी आयुक्त श्री.गौतम साहेब यांनीही अशाच प्रकारची

मोहिम राबविली. शहागंज टपऱ्या तसेच रोषण गेट येथील रस्ता रूंद केला. त्यावेळी ज्यांची टपरी हटविली त्यांना इतर ठिकाणी जागा दिली होती. तिबेटी लोक मिलकॉर्नर चौकात बाजूच्या जागेत व्यापार करीत होते त्यांना हटवून आम्हाला जागा दयावी म्हणून काही लोक उपोषणास बसले.टपरीधारक यांनी मा. उच्च न्यायालयात प्रकरण दाखल केले. त्यावर तिबेटी लोकांना तेथून हटवून इतर ठिकाणी जागा द्यावी व बाजूच्या टपऱ्याही हटवाव्या. महापालिकने म्हणणे मांडले नाही म्हणून एकतर्फी निकाल आला तो मान्य करावाच लागेल. ज्यांचे काढले जात आहे त्यांचे कुटूंबीयावर उपासमारीची वेळ आली याचा विचार केला पाहिजे. मोठया रस्त्यावरील काढलेल्या टपऱ्या लहान २०-१६ फुट रस्त्यावर त्यांना जागा देवू शकतो. अतिक्रमण काढण्याचे काम चांगले होत आहे परंतू कुणावर उपासमारीची वेळ येवू नये याचाही विचार व्हावा. अमुक ठिकाणचे अतिक्रमण हटवावे म्हणून मा.आयुक्तांचे नावाने काही लोकांनी पत्र दिले त्यांची प्रत उपआयुक्त, मा.सभापती, स.सदस्यांना दिली. शहांगजमध्ये २००८ पर्यत ज्यांचेकडून टॅक्स घेतला, स्टे ऑर्डर आहे त्यांचे काढले त्यात सात लोक आहे. लिगली आहे. शहागंजमध्ये मधल्या गल्लीतील ३० फुटाच्या रस्त्यावर टपऱ्या येतात त्यांना रेग्यूलर करावे. मुंबईत फुटपाथवर दोनही बाजुनी रस्ता आहे. शहागंजमध्ये १६-१७ टपऱ्यांचे डिझाईन महानगरपालिकेने तयार करून द्यावे जेणे करून महापालिकेचे उत्पन्न वाढेल. चमन च्या वर ही जागा देवू शकतो रस्त्यावर येत नाही. सात लोक ज्यांचेकडून २००८ पर्यत टॅक्स घेतला टपऱ्या हटविले त्याचे बाबतीतही विचार करावा. तसेच महापालिकेच्या ज्या ठिकाणी जागा आहे अशा जागेवर ज्यांचे टपऱ्या हटविल्या त्यांना तेथे जागा देता येत असेल तर प्रशासन व बॉडीने तसा योग्य तो निर्णय घ्यावा. ज्या ठिकाणी काढायला जाणार त्यांना २-३ तासांची सवलत द्यावी. सामान परत करावे. पोलीसांकडून मार देवू नये. रोजीरोटीचा प्रश्न आहे. मेडीकल भागातील टपऱ्या हटविले. फुटपाथ बांधला. हा फुटपाथ २ फुट उंच बांधून धंद्यास जागा उपलब्ध करून दिली. २ फुट उंचावरून कोण जाणार? शहागंज जवळील टपऱ्यांना रेग्युलर करा. त्यांना चमनजवळ किंवा खाली देता येईल. हा भाग गल्लीत येतो. रोडमध्ये उद्यान झाले. तेथे मॉलीश करणारे जमत होते. चुकीचे काही होऊ नये व रस्त्याच्या पलिकडे जाऊ नये. यांना कायम करावे. ७ लोकांचा निर्णय घ्यावा. त्यांचेकडून भाडे घेतले याची नोंद आहे.

सौ.मोमीन सफिया फिरदोस : ज्याना जागा दिली त्यांचेही काढले अशा २१ दुकाना आहे. पर्यायी जागा द्यावी. शहागंज मागील जागेत काढु नये.

उपआयुक्त(सिडको) : अशा ३४ दुकाने आहे त्यांना पर्यायी जागा देता येईल.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : ज्यांना महापालिकेने परवानगी दिली त्या जर रूंदीकरणात येत असेल त्यांना पर्यायी जागा देण्यात यावी.ज्यांचे नावाने टपरी तोच तेथे व्यवसाय करतो का याची चौकशी व्हायला पाहिजे. त्यांचेच नावाने परवाना आहे का? सिडको भागात ज्यांचा संबध नाही त्यांचे नावाने टप-या आहेत. ज्यांचेवर अन्याय होतो तो दुर करणे महापालिकेचे काम आहे. आज काढलेले अतिक्रमण त्या जागेवर पुन्हा होणार नाही याची दखल घेतली जावी. पूर्वी ज्यानी भाडे भरणा केले ते जमा झालेले आहे का भाडेने देण्यास व लायसन्स कुणी दिले याची तपासणी करावी. व्यवसाय व टपरी टाकणारेसाठी झोन करावे जेथे जागा असेल तेथेच टपरी असावी. शहागंज, गजानन महाराज मंदीर चौकात अनेक टपऱ्या, हातगाड्या लागलेल्या असतात. रस्त्याने मोठी वर्दळ दिसून येते. रस्त्यावर मोठी घाण पडलेली असते. यासाठी मार्केट असावे. फुटपॉथवर काय करता येईल याचा ही विचार करावा सेन्ट्रल नाक्यावर अनेक मच्छीचे दुकाने असतात

संध्याकाळच्या वेळेस घाण दिसून येते यासाठीद मच्छी मार्केट, मटन मार्केट असावे. स्वत: व्यवसाय करेल त्यांनाच लायसन्स ठेवावे. अतिक्रमणाची मोहिम ही जुन्या शहरात रंगारगल्ली, पैठणगेट, मछलीखड अशा भागात ही राबवावी.

श्री.रविकांत गवळी :अतिक्रमण मोहिम चालू केली त्याबध्दल प्रशासनाचे अभिनंदन केले त्यास प्रशासन पात्र ही आहे. शेवटपर्यत ही मोहिम चालू रहावी. रस्त्याचे काढण्यास सुरूवात केली धरसोड होवू न देता व कुणावर अन्याय होणार नाही याची दखल प्रशासनाने घ्यावी. यानंतर महापालिकेच्या मालकीच्या जागेवरील अतिक्रमण काढावे. भुखंड संदर्भात श्री. खरवडकर यांनी अहवाल दिलेला आहे त्यांवर अभ्यास करून चर्चा घेवून योग्य तो निर्णय घेता येईल मोहिम सतत चालू ठेवावी.

श्री.संजय जोशी : पीरबाजार ते शहानुरमिया दर्गा रस्त्यावर जे लोक रस्त्यात येत होते त्यांना जागेचा मोबदला दिला काहींना पर्यायी जागा दिली. ज्यांनी आठ वर्ष झाले मोबदला घेवून ते लोक त्याच जागेवर व्यवसाय करतात. म्हणजे डबल फायदा झाला. यासाठी शहरात असे प्रकारची अतिक्रमणे कुठे झाले याचा शोध घेवून कार्यवाही करावी.

मा.सभापती : याच प्रमाणे चेलीपूरा भागात एका जागेचा ५६ लक्ष मोबदला दिला अद्याप जागा महापालिकेच्या ताब्यात नाही.

श्री.संजय जोशी : व्यक्तीचा म्हणून मोबदला देत नाही मालमत्तेचा मोबदला देतो. लगेच जागा ताब्यात घेतली पाहिजे. अशा किती मालमत्ता आहे शोध घेण्यासाठी एक अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी. पीरबाजार ते शहानुरमिर्या दर्गा रस्त्यापासून काढण्यास सुरूवात करावी.

श्री.अ.रशिद खान : अशा किती मालमत्ता आहे यादी मागवावी पेपरमध्ये द्यावे ३ दिवसाची मुदत दयावी त्यानंतर कार्यवाही करावी.

श्री.संजय जोशी : मुकूंदवाडी भागात १८ खोल्या एक मालक विकायला निघाले आहे. अतिक्रमण केले ते पाडण्याचे मा.न्यायालयाचे आदेश आहेत. सदर व्यक्ती त्या जागेवरील एक एक खोली विकत आहे तरी काढले जात नाही कारण काय?

श्री.सिताराम सुरे : अतिक्रमण मोहिम चालू केली प्रशासन अभिनंदन करतो.२०० फुटाचा जळगाव रोड वर हर्सुल टी पॉईन्ट ते सिडको बसस्टॅण्ड पर्यत तसेच टी.व्ही सेन्टर चौक व बाजूच्या ३० मीटरच्या रस्त्यावर मोठया प्रमाणात अतिक्रमण झाले ३० मी. ऐवजी १० मीटरचाच रस्ता दिसत आहे. पायी चालता येत नाही. मोठया प्रमाणात अतिक्रमण झाले.

मा.सभापती : सदर अतिक्रमण केंव्हा काढणार आहे खुलासा करावा.

उपआयुक्त(सिडको) : मा.आयुक्त यांचे निर्देशानुसार व सर्वांच्या सहकार्याने सोमवार पासून अतिक्रमण काढण्याची मोहिम हाती घेतली. नागरिकांचा सकारात्मक प्रतिसाद मिळतो. प्रशासनातर्फे आभारी आहोत. शहरातील संपूर्ण अतिक्रमणे काढावे याच्याशी सर्व सहमत आहे. रस्त्यावरील, नवीन आणि स.सदस्यांनी सुचविलेले सर्वच अतिक्रमणे एकाच वेळी काढणे शक्य होणार नाही टप्प्या टप्प्याने प्लॅनींग करण्यात येत आहे. प्राधान्याने कोणती अतिक्रमणे काढायची वार्ड अधिकारी यांचेकडून माहिती घेतली आहे. शहांगज नंतर रेल्वेस्टेशन येथील रस्ता काल व आज मोकळा केला व त्या ठिकाणी विकास कामे तात्काळ होण्यासाठी संबधीत अधिकारी यांनी कार्यवाही सुरू केली. काढलेल्या ठिकाणी शक्यतो पुन्हा अतिक्रमण होणार नाही याची काळजी प्रशासन घेत आहे. जे काढणार आहोत त्या भागातील लोकांना दोन दिवस अगोदर नगर रचना कडून मार्कींग करून कल्पना दिली जाते. त्यानंतर अतिक्रमण काढण्याची कार्यवाही ही आपल्या सर्वांच्या सहकार्याने होत आहे.

| | |
|---|---|
| श्री.मोहन मेघावाले | : अतिक्रमण काढण्याची नवीन आयुक्त यांनी मोहिम हाती घेतली. त्यांचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करतो.ज्यांना जागा दिली त्यांचेवर अन्याय होवू नये याची दखल घ्यावी. अनेक चौकात, रस्त्यावर हातगाडया लहान मोठे व्यवसाय करणारे लोक दिसतात. टी.व्ही सेन्टर चौकात व बाजूला रस्त्यावर मोठया प्रमाणोत हातगाडया दिसून येतात मुली व महिलांना जाण्या येण्याचा त्रास होतो. पाउस पडेपर्यंत रसवंतींना परवानगी असते. अद्याप रस्त्यावरून हटविल्या नाही. पानपोईला पण उन्हाळयात परवानगी देतो त्या ही हटविल्या नाही.हर्सुल टी पॉईन्ट ते सिडको बसस्टॅण्ड रस्त्यावर मोठया प्रमाणात अतिक्रमण बिअरबारची दुकाने असून अनेक लोक चौकात मद्यपान केलेले व वाहन रस्त्यावर पार्क केलेले दिसून येतात. या रस्त्यावर वाळू खडीचे ट्रॅक्टर उभे असतात. सिडकोत ३० फुटाच्या रस्त्यामध्ये अनेक अतिक्रमण आहे ते काढण्याची काळजी प्रशासनाने घ्यावी. |
| श्री.अ.रशिद खान | : मिलकॉर्नर चौकातील शाहू महाराज यांचा पुतळा डिजीटल बोर्डमुळे दिसत नाही. |
| श्री.सतीश कटकटे | : रविवार बाजार च्या बाजूला जाफरगेट मधील अतिक्रमण हटवावे. |
| श्री.कचरू मोरे | : अतिक्रमण मोहिम ही सतत चालू ठेवावी जेणे करून शहर स्वच्छ होईल पीरबाजार ते दर्गा रोडवर वर तसेच मनपाच्या हजेरी सेन्टरच्या, पीरबाजारच्या मध्ये एका ठिकाणी मच्छी, मटन शॉप असून रस्त्यावर आहे. वाहन टर्न घेवू शकत नाही याच बरोबर वेंदातनगर ते फुलेनगर व एसएससी बोर्ड ते रेल्वे गेट पर्यत अतिक्रमण काढणे गरजेचे आहे.काही लोकांनी इजिनिअरींग कॉलेजच्या जागेत अतिक्रमण करून टप-या टाकल्या महापालिकेच्या जागेच्या फायदा घेवून अनेक ठिकाणी लोक अतिक्रमण करीत आहे. बेराजगारी वाढलेली आहे. ज्यांचे टपरया हटविल्या त्यांना पर्यायी जागा महापालिकेची त्याच भागात असलेली दुकाने, जागा द्यावी जेणे करून त्यांची गैरसोय होणार नाही. वेदांतनगर रोड ३०-३१ दुकाने आहे तेथे बांधता येईल. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | : डिजीटल बोर्ड काढण्यासाठी गेल्यावर विरोध होतो हे योग्य नाही. ते किती काळ ठेवावे याचे लिमीट घालून द्यावे. |
| श्री.संजय जोशी | : परवानगीचे काढले जातात. विना परवानगी अनेक बोर्ड आहे. एक दिवसाचे रक्कम घेतो दुसऱ्या दिवशी दिसेल तर महापालिकेने काढावे म्हणून निर्णय घेतलेला आहे. गजानन महाराज मंदीर ते सेव्हनहिल पर्यत रस्त्यावर रिलायन्सचे फ्रेशचे ७-८ दुकाने सुरू केले विना परवानगी लागले फायरची एनओसी घेतली का? लाखो रूपये कर बाकी आहे वसूल का केला जात नाही. |
| मा.सभापती | : या बाबत संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा. |
| मुख्य अग्निशमन अधि. | : रिलायन्स फ्रेशच्या परवानगी संदर्भात अर्ज आलेले आहे. मालमत्ता, पाणीपट्टी बाकी नाही. जास्त आले होते ते घेतले नाही. अद्याप लायसन्स दिले नाही. |
| श्री.संजय जोशी | : परवानगी नसतांना ६-८ रिलायन्स फ्रेशचे दुकान सुरू का होवू दिले. |
| मुख्य अग्निशमन अधि | : दोन दुकानचे २५-२५ असे ५० हजार प्राथमिक फिस म्हणून भरणा करून घेतलेली आहे अर्ज खूप आले होते परंतू त्यांचेकडे मालमत्ता व पाणीपटटी कर बाकी आहे त्यामूळे एनओसी दिली नाही. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | : कोणतीही कपंनी अनधिकृतपणे काम करीत नाही. दुकान चालविण्यासाठी एनओसीची गरज असते का? परवानगी कोणाकडे आहे. |
| श्री.अ.रशिद खान | : शहरातील संपूर्ण चौकातील, रस्त्यावरील डिजीटल बोर्ड काढावे. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | : पुतळयाच्या बाजूचे चौकातील व रस्त्यामध्ये अडथळा निर्माण करणारे सर्व डिजीटल बोर्ड काढण्याचे आदेशीत करावे. |

| | |
|---|---|
| मा.सभापती | : शहरातील विविध चौकात महापुरूषाच्या पुतळयाच्या बाजूला असलेले डिजीटल बोर्ड तसेच शहरातील इतर ठिकाणचे रस्त्यावरील डिजीटल बोर्ड काढून तीन दिवसात स्थायी समितीकडे अहवाल सादर करावा. |
| श्री.संजय जोशी | : कर्मचा-याचे पगार, ठेकेदाराची बिले अदा करण्यासाठी पैसे नाही. अनेक एजन्सी कंपनीकडे दुकानदाराकडे लाखो रूपये थकबाकी आहे. मोबाईल कंपन्यांकडे दोन ते अडीच कोटी थकबाकी आहे. वसूल का केले जात नाही. |
| मा.सभापती | : मोबाईल टावर्स च्या बाबतीत खुलासा करावा. |
| उपअभियंता (न.र.) | : मोबाईल टावर्स अनामत रक्कम १.५० कोटी जमा झाला आहे. सर्व टावर्सला एनओसी दिलेली नाही. |
| श्री.संजय जोशी | : जे विना परवानगी चालू आहे त्यांचेकडूनही एवढाच महसूल जमा होवू शकतो. |
| मा.सभापती | : किती टावर्स परवानगीने उभे आहे कितीना परवानगी दिली नाही.खुलासा करावा. |
| उपअभियंता(न.र.) | : सध्या या बाबतीत माहिती नाही पूढील बैठकीत दिली जाईल. |
| श्री.संजय जोशी | : काही इमारतीला परवानगी दिली टावर्स केले ते केले असल्याने भोगवटा प्रमाणपत्र दिले नाही. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | : ज्यांनी परवानगी घेतली नाही असे किती टावर्स आहे याचा सर्वे करावा. |
| श्री.संजय जोशी | : माझे माहिती प्रमाणे १६० टावर्स आहे आणखी संख्या वाढली असेल.परवानगी किर्तीना दिली कितीना नाही किती टावर्सला परवानगी देवू शकतो याची पुढील बैठकीच्या अगोदर माहिती सादर करण्याचे आदेश करावेत. |
| मा.सभापती | : शहरात एकूण टावर्स किती अनधिकृत किती अधिकृत किती.तसेच भोगवटा प्रमाणपत्र न घेता अशा इमारतीवर असलेल्या टावर्सची यादी व इतर सर्व माहिती पुढील सभेत देण्यात यावी. |
| श्री.मोहन मेघावाले | : टी.व्ही सेन्टर चौकातील संभाजी महाराज यांचे पुतळयाच्या भोवताली तसेच बाजूला एक खुले मैदान आहे त्या बाजूला रस्त्यावर हातगाडया उभ्या असतात मागिल बैठकीत काढण्याचे आदेशीत केले होते कार्यवाही केली नाही. |
| श्री.रविकांत गवळी | : ही सातवी बैठक होत आहे यापूर्वीच्या सर्व बैठकीतील आपल्या आदेशाचे पालन झालेले आहे का तसेच चुन्नीलाल पेट्रोल पंप जवळील दुभाजक दोन दिवसात बंद करून अहवाल सादर करण्याचे आदेशीत केले होते कार्यवाही झाली का? |
| श्री.अ.रशिद खान | : पोलीस विभागाची एनओसी आल्यानंतर दुभाजक काढले होते. आताही एनओसी आल्यानंतर काढणार काय? सिग्नलसाठी १० लक्ष खर्च केले काढणार परत ठेवणार खर्च का करण्यात येतो. खर्चास जबाबदार कोण. |
| श्री.सतीश कटकटे | : दुभाजक काढण्यासाठी एनओसी चे पत्र असेल तर दाखवावे. |
| श्रीमती जयश्री किवळेकर | : सिडकोतील अतिक्रमण काढण्या संदर्भात मागिल बैठकीत आपण आदेश केले अदयाप काढले नाही. या संदर्भात नवीन आयुक्त यांचे निदर्शनास ही बाब आणून दयावी.यात टी.व्ही सेन्टर कामगार चौक, वसंतराव नाईक चौक सिडको बसस्टॅण्ड ई ठिकाणचे अतिक्रमण काढण्याचे आदेशीत करावे. |
| मा.सभापती | : उप आयुक्त (सिडको) यांनी दखल घ्यावी. शहागंज चमन च्या मागे किती दुकाने आहे त्यांचेकडे भाडे किती थकलेले आहे. |
| श्री.संजय जोशी | : अशा दुकानदारांना टाईप डिझाईन द्यावे. एक साईजचे मॉडल तयार करून द्यावे एक सारखेच दुकान असावे. |
| प्र.मालमत्ता अधि. | : शहागंज चमनच्या मागे एकूण ४२ टपऱ्या आहेत. कुणाकडे किती भाडे थकलेले आहे माहिती घेवून खुलासा देण्यात येईल. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | : दोन दिवसात सिग्नल बंद करण्याचे आदेश केले होते अदयाप बंद का केले नाही. |

श्री.रविकांत गवळी : मा. सभापती यांनी रूलींग दिल्यानंतर अमलबजावणी झाली पाहिजे ही विनंती.

मा.सभापती : ॲक्शन पाईन्ट दिल्यानंतर जर संबधीत अधिकारी कार्यवाही करीत नसेल तर येणाऱ्या बैठकीत संबधीत अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्याचे आदेशीत केले जाईल.

श्री.रविकांत गवळी : जो निर्णय होतो तो सर्वाच्या सम्मतीनेच होतो. त्यांची अमलबजावणी होत नसेल तर स्थायी समितीचा अपमान आहे.

श्री.अ.रशिद खान : सभा संपल्यानंतर नगरसचिव हे सर्व विभागास ॲक्शन पॉईन्ट देतात का?

मा.सभापती : ॲक्शन पॉईन्ट दिले जाते यापूढे त्या-त्या विभागाचे संबधीत अधिकारी यांनी ॲक्शन पॉईन्ट नुसार कार्यवाही करावी.

मा.सभापती : शहागंज भागात ४२ टपऱ्यांना परवानगी दिली. त्यांचेकडील थकबाकी असलेले भाडे वसूल करून प्रशासनाकडून एक मॉडल तयार करून त्यांप्रमाणे टपरी तयार करावी व टपरी समिती ठरवेल त्या भाडे प्रमाणे तीन वर्षासाठी टपरी भाडेने देतील. ४२ टपऱ्या या ३० मी. च्या रोडवर येत नाही व मा.न्यायालयाने दिलेले निर्देशांचा भंग होत नाही महापालिकेला भाडेपोटी उत्पन्न मिळेल व या ठिकाणी चार बाजूने रस्ता असल्यामूळे सदरील टपऱ्या नियमीत करून महापालिका ठरवून देईल ते मॉडेल तयार करून त्या नियमीत करण्यास मान्यता देण्यात येते. जे सात टपरीधारक यांनी महापालिकेला भाडे दिले त्यांचे टपरी काढल्या त्या संदर्भात प्रशासनाने प्रस्ताव ठेवावा.

श्री.संजय जोशी : रिलायन्स फ्रेश बाबत खुलासा करावा.

आरोग्य वैद्य.अधिकारी : रिलायन्स फ्रेशला गेल्या २ दिवसापुर्वी अर्ज आला होता. त्यांना लायसन्स दिले ते किती दुकानांना व केंव्हा दिले याची माहिती घ्यावी लागेल.

श्री.संजय जोशी : महापालिकेचेच दोन विभाग आहे आरोग्य विभागाने लायसन्स दिले फायरचे सांगतात कर थकबाकी होती म्हणून एनओसी दिली नाही. फायरची एनओसी नसतांना परवानगी दिली जाते हे चुकीचे आहे. अधिकारी नवीन आहे पुढील बैठकीत या सर्वच बाबतीत माहिती मागवावी.

आरोग्य वैद्य.अधि. : पुढील बैठकीत सर्व माहिती घेवून सादर करण्यात येईल.

श्री.संजय जोशी : शहरात रिलायन्स फ्रेशची किती दुकाने आहे. माझे माहिती प्रमाणे संपूर्ण अनधिकृत आहे. महापालिकेने अपेक्षीत रक्कम त्यांचेकडून वसूल करावे त्यानंतर परवानगी द्यावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : महापालिकेच्या दोन विभागात ताळमेळ बसत नाही दुर्दव आहे. जे दुकान व मॉल्स यास कोणत्या विभागाकडून परवानगी दिली गेली. त्यास फायरची एनओसी आहे का, चौकशी करावी.

मा.सभापती : शहरात किती मॉल्स व रिलायन्स कंपनीचे दुकाने आहेत ज्यांना फायरची एनओसी दिलेली आहे.

मुख्य अग्निशमन अधि.: या विभागाकडे १६ मॉलसची नोंद झालेली आहे स्पेन्सर यांनी पाच-सहा दुकानांना एनओसी घेतलेली आहे. मनीयार, सपना मार्केट यांनी फायरची एनओसी घेतली नाही. विशाल मेगा मार्केट यांनी फिस भरणा केली परंतू अग्निशमनची सुरक्षा घेतली नाही म्हणून त्यांना धोकादायक घोषित केलेले आहे. बीग बाजारने अग्निशमनची सुरक्षा घेतली आहे.

श्री.संजय जोशी :ज्यांनी एनओसी घेतली नाही उद्याच सिल लावावे. १६ पैकी किती लोकांनी घेतले आहे.

मुख्य अग्निशमन अधि.: स्पेन्सरने ३ ची घेतली, ३ ची घेतली नाही मनीयार, सपना सुपर मार्केटने घेतली नाही. विशाल मार्केटने फिस भरणा केली सुरक्षा घेतली नाही म्हणून धोकादायक घोषित केले. १६ पैकी ५ लोकांनीच घेतले आहे.

मा.सभापती : १६ पैकी ज्या ११ लोकांनी एनओसी घेतली नाही अग्निशमन विभागाचे अधिकारी यांनी त्या ११ मॉल्सची यांदी उद्या सकाळी १०-०० वाजेपर्यत उपआयुक्त श्री. शेटेसाहेब यांचेकडे सादर करावी. त्या ११ मॉल्सला सिल लावून उद्या संध्याकाळपर्यत माझेकडे अहवाल सादर करावा.

मुख्य अग्निशमन अधि. : विशाल मार्केटला मा. आयुक्तांनी स्थगिती दिली होती पूढे ते चालूच आहे.

श्री.संजय जोशी : नवीन आयुक्त यांचेकडे संचिका ठेवावी ते स्थागिती देणार नाही लगेच कार्यवाही करतील.

श्री.रविकांत गवळी : मोबाईल टावर्स, पेट्रोल पंप, मॉल्स बाबत पुढील बैठकीत माहिती मागवावी तसेच खुले भुखंड जो अहवाल दिला त्यावर ही चर्चा करून योग्य तो निर्णय घ्यावा. शिवसेनेचा २३ वा वर्धापण दिन होता संत एकनाथ खुले मंचा समोर लोकाना जा-ये करण्यासाठी जागा नव्हती रस्त्याच्या दोन्ही बाजूला दोन-चार चाकी वाहने लागलेली होती. संत एकनाथ रंग मंदीरच्या बाजूला आरक्षीत प्लॉट पार्कीगसाठी सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने करून घेतले ते हस्तांतर केले का तेथील पार्कींग चालू आहे का याचा खुलासा घ्यावा.

श्री.संजय जोशी : ज्यावेळेस ॲक्युमोडेशन रिझरर्वेशनचा प्रकार असा असतो की पहिल्यांदा पार्कींग महापालिकेने ताब्यात घ्यायला पाहिजे त्यानंतर संबधीताने बांधकाम सुरू करायला पाहिजे.अजूनही जागा महापालिकेच्या ताब्यात नाही.

मा.सभापती : संबधीत अधिकारी श्री.वझे रजेवर आहे पूढील बैठकीपासून स्थायी समिती व सर्वसाधारण सभेत त्यांनी उपस्थित रहावे.

श्री.रविकांत गवळी : आरक्षीत प्लॉट होता बांधकाम परवानगी कशाच्या अधारे दिली पार्कीग ताब्यात घेतली का जे बांधकाम केले ते सेलआऊट झाले का ते करण्याचे अधिकार त्यांना आहे का?

मा.सभापती : पुढील बैठकीत याचा खुलासा होईल.

श्री.रविकांत गवळी : पुढील बैठकीत मोबाईल टावर्स, पेट्रोल पंप, खुले भुंखड, मॉल्स आणि रिलायन्स फ्रेश तसेच संत एकनाथ रंग मंदीरच्या बाजेच्या पर्कीग बाबत पुढील बैठकीत माहिती मागवावी.

मा.सभापती : आताच सुचना केल्याप्रमाणे या सर्वाची माहिती पुढील बैठकीत प्रशासनाने ठेवावी.

श्री.संजय जोशी : सुरूवातीला सुपर मार्केट सुरू झाले. त्यांचेकडे ५-५ वर्षाची कराची थकबाकी आहे. संत एकनाथ रंगमदीर जवळची जागा महापालिकेचे ताब्यात का घेतली नाही तसेच शहरात मॉलस आहे व त्यांचेकडे किती थंकबाकी आहे ही सर्व पूढील बैठकीत माहिती द्यावी.

मा.सभापती : सर्व माहिती पूढील बैठकीत सादर करावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : एक महिण्यात झालेल्या बैठकामध्ये घेतलेल्या निर्णयावर काय कार्यवाही केली याची माहिती घेण्यासाठी महिन्याच्या शेवटी एक बैठक घेतली जावी. मी तीन वर्षापासून बोलता आहे कार्यवाही होत नाही. तसेच कर्मचा-यांनी ओळखपत्र लावावे निर्णय घेतला कुणीही लावत नाही. जो निर्णय सभागृह घेते त्यांची अमलबजावणी व्हायला पाहिजे. मागिल बैठकीत चुन्नीलाल पेट्रोल पंप जवळील सिग्नल बंद करण्याचा निर्णय घेतला कार्यवाही केली नाही.

श्री.अ.रशिद खान : सिग्नलचा एक जरी पार्ट तुटला तरी दुसरेकडे बसवितांना तेवढाच खर्च लागतो. मा.सभापती यांनी दिलेले रूलींग चुकीचे होवू शकते. तरी ही कार्यवाही करणे योग्य आहे का? सिग्नल बसविले एनओसी होती का नसेल तर कोणत्या अधिकाऱ्यांनी काम केले.

श्री.रविकांत गवळी :मा. आयुक्तांनी परवानगी दिली. त्यावेळी अपघात झाला नसेल १० लक्षची किमत एका व्यक्तीच्या प्राणाची बरोबरी नाही.अपघात होतो लक्षात आल्यास एनओसी रद्द करता येते. मा.सभापती यांनी आदेश केलेले आहे त्यांची अमलबजावणी करावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : एनओसी होती का १० लक्ष खर्च केले.

अति.शहर अभियंता : सिग्नल बसविल्यानंतर दुभाजक काढून रहदारी सुरळीत करावी कन्डीशनल एनओसी मिळालेली होती. दुभाजक काढून रस्ता करून देण्याची काही सदस्यांनी मागणी होती त्यानुसार पोलीस विभागाकडे महापालिकने कार्यवाही केली त्यानुसार एनओसी मिळाली.

श्री.अ.रशिद खान : तेथील दुभाजक काढून रस्ता करू नये म्हणून मोर्चे वगैरे आले तरी सिग्नल बसविले.

अति.शहर अभियंता : सिग्नल बसविल्यानंतर मोर्चे आले त्या अगोदर मा. पोलीस आयुक्त यांची परवानगी मिळाली होती.

श्री.रविकांत गवळी : सिग्नल बसविण्या अगोदर दुभाजक तोडलेले होते रस्ता केला. वाहतूक जास्त झाली अपघात झाला त्यानंतर सिग्नल बसविले. त्यासाठी तेथील सिग्नल काढून दुभाजक बंद करून जेथे आवश्यक आहे तेथे सिग्नल लावावे. मा.सभापतीनी यापूर्वी रूलींग दिले त्याची अमलबजावणी का केली नाही.

अति.शहर अभियंता :सभागृहाने घेतलेल्या निर्णयानुसार ट्रॅफिक ब्रँच कडे पुन्हा पत्र देवून सिग्नल काढण्याबाबत एनओसी मागविलेली आहे. उद्यापर्यंत एनओसी मिळेल त्यानंतर मा.आयुक्त यांची परवानगी घेवून १-२ दिवसात कार्यवाही करण्यात येईल.

"राष्ट्रगीता"नंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १७/०६/२००८ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०७) इतिवृत्त**

**मंगळवार, दिनांक १७ जुन २००८ रोजी** स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री. अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील **मलीक अंबर स्थायी समिती सभागृह** येथे दुपारी ११-५० वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली. या सभेला मा.आयुक्त(प्र.), नगर सचिव यांचे सह संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१. श्री. अ. रशीद खान
२. श्री. कचरू विश्वनाथ मोरे
३. श्री. मोहन धन्नुलाल मेघावाले
४. श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर
५. श्री. जोशी संजय रामदास
६. श्री. सतीश विश्वनाथ कटकटे
७. श्री. रविकांत काशिनाथ गवळी
८. श्रीमती मोमीन सफिया फिरदोस
९. श्रीमती जयश्री किवळेकर
१०. श्री. सिताराम सुरे
११. श्री. नारायण तिलोकचंद कुचे
१२. श्री. जावेद हसन खान

**संवाद :**

श्री.अ.रशिद खान : अनेक अधिकारी महत्वाच्या कामानिमित्त गेलेले असून आज उपस्थित नाही. आजची सभा तहकूब करून उदया सभा आयोजित करावी यापूढे स्थायी समितीची सभा वेळेवर सुरू व्हावी अशी सभागृहाच्या वतीने विनंती करतो.उदयाच्या सभेला सर्व अधिकारी उपस्थित राहतील या बाबत नगरसचिव यांनी सर्वांना तसे कळवावे.

मा.सभापती : आजच्या सभेला तीनही उप आयुक्तासह अनेक अधिकारी शासकीय कामानिमित्त बाहेर असल्याने सभागृहाची भावना लक्षात घेता आजची सभा तहकूब करण्यात येवून उद्या दिनांक १८-६-२००८ रोजी दुपारी ४-०० वाजता सभेचे कामकाज होईल. याची सर्व अधिकारी व उपस्थित सर्व सदस्यांनी नोंद घ्यावी.

या नंतर आजची सभा तहकूब केल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**स्थायी समिती सभा**

**कार्यक्रम पत्रिका क्रमांक (07)**

**दिनांक :- १७/०६/२००८**

## सू च ना

दिनांक १७/६/२००८ रोजी तहकुब करण्यात आलेली स्थायी समितीची सभा आता **बुधवार दिनांक १८/६/२००८ दुपारी ४.०० वाजता** 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे आयोजित करण्यात येत आहे. सभेची विषयपत्रिका (कार्यक्रम पत्रिका क्र.०७) यापुर्वीच वक्तशीर वितरीत करण्यात आलेली आहे.

**सभा वेळेवर सुरू होईल. कृपया याची नोंद घ्यावी** व सभेस वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे, ही विनंती.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद